गोवा सरकार

माहिती आणि प्रसिध्दी खाते

पणजी-गोवा

वार्तापत्र

## ग्रामीण पत्रकारांसाठी आज साखळीत कार्यशाळा

ता. 02 ऑगस्ट 2019

11 श्रावण 1941

गोवा सरकारच्या माहिती आणि प्रसिध्दी खात्यातर्फे साखळी रविंद्र भवन यांच्या सहकार्याने शनिवार 3 ऑगस्ट रोजी पत्रकारांसाठी कार्यशाळेचे आयोजन केले आहे.

येथील रविंद्र भवनात होणाऱ्या कार्यशाळेचे उद्‌घाटन मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांच्याहस्ते सकाळी 10.00 वा होणार आहे. यावेळी माहिती आणि प्रसिध्दी खात्याच्या संचालिका श्रीमती मेघना शेटगांवकर, रविंद्र भवनचे उपाध्यक्ष श्री. विठोबा घाडी व रविंद्र भवनचे सदस्य सचिव श्री. विवेक नाईक उपस्थित राहणार आहेत.

अर्धा दिवस चालणाऱ्या कार्यशाळेत आत्महत्या व इतर निगडीत विषय पत्रकारांनी कसे हाताळावेत यावर डॉ. पिटर कॅस्तेलीनो मार्गदर्शन करणार आहेत व नंतर श्री. संदेश प्रभूदेसाई यांचे उपस्थित पत्रकारांना मार्गदर्शन होणार आहे.

वरील कार्यशाळेला ग्रामीण पत्रकारांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन माहिती व प्रसिध्दी खात्यातर्फे करण्यात आले आहे.

मा/वाप/एमएस/जॉआ/रना/प्रधु/2019/429